Copy of letter Received from Inspector of Lifts to be disributed to Lift users - and Lift owners for Safety of Passangers Important Safety Rules and amendments.

# परिपत्रक

Through ROYAL ELEVATORS

Letter Dated - 25/11/2010.

**विषय : उदवाहनाचा सुरक्षित वापर व उदवाहन नियमाचे जनजागृतीबाबत**

आपणांस विषयांकित परिपत्रकानुसार कळविण्यांत येते की, दिवसेंदिवस उदवाहनांच्या गरजेनुसार उद्वाहनांची वाढती संख्या व तीचा वापर मानवी जीवनात सुरक्षितपणे होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेकडून उदवाहनाचा वापर सुरक्षितरित्या होणे गरजेचे आहे, ज्यामुळे उदवाहन अपघात कमी होवू शकतील.

त्या दृष्टीकोनातून सर्व उदवाहन ठेकेदारांनी त्यांच्याकडे देखभालीसाठी असलेल्या उदवाहनांच्या ठिकाणी शक्यतो मोठया संकुलामध्ये जन जागृतीचे कार्यक्रम करावे, असे कार्यक्रम वर्षातून किमान ६ वेगवेगळया ठिकाणी करावे व त्यानुसार या कार्यालयास अहवाल सादर करावा.

उदवाहनाचा सुरक्षित वापर व सुरक्षित देखभालीबाबतचे दिनांकीत २३.११.२०१० चे परिपत्रक सोबत जोडण्यांत येत आहे. तसेच या परिपत्रकात केलेल्या मार्गदर्शनपर सुचनांचे पालन करण्याच्या दृष्टीने ठेकेदारांनी त्यांच्याकडे देखभालीसाठी असलेल्या उदवाहन मालकास (उदवाहन अनुज्ञप्ती धारकास) सदर परिपत्रक देवून अवगत करावे.

जा.क्र.विनिउमुं/ परिपत्रक/ ९३४९/२०१०
विद्युत निरीक्षक (उदवाहन मुंबई) यांचे कार्यालय,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
पहिला मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
सार्वजनिक बांधकाम विभाग आवार,
रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व)
मुंबई - ४०० ०७१
☎ : ०२२- २५२२५२०४

दि. २५/११/२०१०

(संजय मु. भस्मे)
विद्युत निरीक्षक (उदवाहन मुंबई)
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
चेंबूर, मुंबई

प्रत : मुख्य अभियंता (विद्युत), सा.बां.विभाग, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत : सर्व उद्वाहन ठेकेदार यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
मे. रॉयल इलेव्हेटर्स, कुर्ला, मुंबई. ४०००७०
..........................................................................
यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सोबत : दि.१८.१०.२०१० चे परिपत्रक

प्रत : सहाय्यक विद्युत निरीक्षक (उदवाहन), कक्ष क्र.१,२,३,४,५,६ मुंबई व ७.८,९,१० पुणे यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

प्रत : स्वीय सहाय्यक यांना माहितीसाठी

प्रत : कार्यालयीन नस्तीस व परिपत्रक नस्तीस.

# परिपत्रक

## विषय :- उद्वाहनाच्या सुरक्षिततेबाबत
## (SAFETY TIPS FOR LIFTS)

विषयांकित परिपत्रकानुसार सर्व अधिकृत उद्वाहन ठेकेदारांना कळविण्यात येते की, उद्वाहनाची सुरक्षितता व उद्वाहन हाताळण्याच्या दृष्टीने, तसेच उद्वाहन उभारणी करतांना अथवा देखभालीच्या वेळी उद्वाहन संच मांडणीत खालील बाबींची व्यवस्था करणे अनिवार्य आहे. उद्वाहन मालक/ उद्वाहन कंत्राटदाराने खालील बाबी स्वतः तपासुन त्या असल्याची खात्री करावी.

१) मुंबई उद्वाहन अधिनियम १९३९ कलम ७ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाने अनुज्ञाप्ती दिल्याशिवाय कोणतेही उदवाहन चालवू नये. तसेच उदवाहन कंत्राटदाराने उदवाहनाची वैध अनुज्ञाप्ती असल्याशिवाय सदर उदवाहनाचे देखभाल व दुरुस्तीचे कंत्राट घेवू नये.

No Lift shall be operated without the License issued by P.W.D.. No. Lift contractor shall undertake the maintenance contract of any lift without confirming that the same is Licenced.

२) मुंबई उद्वाहन नियम १९५८ मधील नियम ६ (v) अन्वये उद्वाहनाची परिरक्षा मान्यता प्राप्त उद्वाहन ठेकेदार, फर्म किंवा कंपनी मार्फतच करणे अनिवार्य आहे.

Rule 6(v): It is essential that the maintenance contract of each lift is entrusted with only a Licenced Lift Company, firm or contractor.

३) मुंबई उद्वाहन नियम १९५८ मधील नियम ६ (vi) तरतुदीनुसार उद्वाहनाची परिरक्षा करणा-या मान्यता प्राप्त ठेकेदाराने उद्वाहन संच मांडणीतील सुरक्षिततेची साधने तपासुन उद्वाहन सुस्थितीत चालू ठेवायला पाहिजे. उद्वाहनाच्या संच मांडणीत काही बिघाड निदर्शनास आल्यास त्याची माहिती उद्वाहन मालकास /परवानाधारकास त्वरीत द्यावी.

Rule 6(vi) :- Every company/contractor entrusted with the maintenance of the Lift shall keep the safety devices intact and report to the owner of the lift immediately if any defect is found in the lift installation for rectification.

४) मुंबई उद्वाहन नियम १९५८ मधील नियम ५/२ (i) अनुसार उद्वाहन कार दरवाजाच्या खालच्या जागेत कार अंपरॉन (टो गार्ड) लावणे अनिवार्य आहे. तसेच स्वंचलित दरवाजे असलेल्या उद्वाहनासाठी फेसिआ प्लेट लावण्यात यावेत.

*Rule 5 /2(j) For all lifts substantial apron (Toe guard) of minimum 750mm depth shall be provided.

५) मुंबई उद्वाहन नियम १९५८ मधील नियम ५/२५ (h) अनुसार उद्वाहन देखभालीच्या वेळी उद्वाहन बंद चालू करण्यासाठी आवश्यक असलेला स्विच हा हाताने ओढून चालू व हाताने ढकलून बंद अशा पध्दतीचा कार टॉपवर व उद्वाहन पीट मध्ये सहज दिसण्यासारखा व सहज हाताळता येण्याजोगा बसविण्यात यावा.

*Rule 5/25(h) :- Emergency stop/maintenance /inspection /switch of manually opened and closed type shall be provided and maintained on the top of every lift car and lift pit which shall be marked conspicuously and shall be easily accessible from the landing floors. For the emergency stop/inspection/switch the provision of IS 14665:2000 Part 3:Section 1 clause 9.3, 9.4 shall be complied with.

६) मुंबई उद्वाहन नियम १९५८ मधील नियम ५/५ (i) (b) अनुसार व्हिजन पॅनलसाठी वापरण्यात येणारी काच पारदर्शक व लॅमिनेटेड असावी तसेच धातुच्या मजबुत जाळीने संरक्षित असावी.

**Rule 5/5 (i) (b) : Where glass is provided for vision panel; such glass shall be of fully transperant and tuffened with 5mm thickness protected by providing strong metallic grill.**

७) मुंबई उद्वाहन नियम १९५८ मधील नियम ५/२६ (b) अनुसार सर्व ट्रेलिंग केबल ह्या लवचिक (फ्लेक्झिबल) बनविलेल्या व अग्नीरोधक (फायर प्रुफ) असाव्यात. (मुंबई फायर इन्शुरन्स असोशिएशन व भारतीय विद्युत नियम १९५६ च्या मानकांची पुर्तता करणाऱ्या असाव्यात.)

**Rule 5/26(b):- All trailing cable shall be flexible construction and shall be fire retardent. (Conforming the standards of Bombay Fire Insurance Association and Indian Electricity Rules).**

८) मुंबई उद्वाहन नियम १९५८ मधील नियम ५/२८(g) अनुसार अंतिम (फायनल किंवा अल्टीमेट) लिमिट स्वीचेस हे लिफ्ट शाफ्टमध्ये उद्वाहन रेलवर लावण्यात यावेत. व ते उद्वाहन कारच्या हालचालीने कार्यान्वित व्हायला पाहिजे. तसेच लिमिट स्विचेस कार्यान्वित होण्यासाठी असणाऱ्या कॅम्स धातूचे असणे आवश्यक आहे.

Rule 5/28(g):-The final Limit Switches shall be affixed on the rail, inside the lift shaft and shall be operated by the movement of the lift car. The cams for operating the limit switches shall be of metal.

९) भारतीय विद्युत नियम १९५६ मधील नियम ६१ अनुसार उद्वाहन संच मांडणीतील इलेक्ट्रीक मीटर विद्युत शक्ती नियमित व नियंत्रीत करणारी साधने व विद्युत शक्तीचा उपयोग करणारी सर्व यंत्रे यांचे सर्व धातुंचे भाग दोन वेगवेगळया वाहकांनी वेगवेगळया प्रकारे भुसंपर्कीत करावेत. (उद्वाहन संच मांडणी करीता स्वतंत्र अर्थिंग करण्यात यावी.)

I.E. Rule 1956

Rule 61. : The metallic body of Energy meter, the frame of the Lift Motor and other medium voltage energy consuming apparatus, all associated with the lift installation shall be efficiently earthed by two separate and distinct connections with earth.

१०) भारतीय विद्युत नियम १९५६ मधील नियम ६१ (अे) अनुसार उद्वाहन संच मांडणीतील सिंगल फेज व थ्री फेज सर्किट मध्ये योग्य क्षमतेची इ.एल.सी.बी. (E.L.C.B) लावण्यात यावी.

Rule 61(A) : Earth leakage circuit breakers of appropriate rating shall be provided for the three phase and single phase circuits associated with the lift and its installation.

११) उद्वाहनाच्या प्रत्येक मजल्यावरील दरवाजाला इमर्जन्सी डि लॉकिंग सिस्टीम असणे आवश्यक आहे. Emergency de-locking arrangement shall be provided to each landing gate to rescue the trapped passengers.

१२) लाकडी कॅम ऐवजी इलेक्ट्रो मॅग्नेटीक रिटायरिंग कॅमचा उपयोग करावा.

Electro Magnetic retiring cam shall be used. Do not use wooden cam.

१३) कार टॉपवर सेफ्टी गार्ड बसविणे आवश्यक आहे.

Safety barricade shall be provided on the car top.

१४) मुंबई उदवाहन नियम १९५८ मधील नियम ५/६ (अे) अनुसार प्रत्येक लँडींग गेट इलेक्ट्रो मेकॅनिकल लॉकिंग पध्दतीने लावण्यात यावा. लँडींग गेट व लॉक मध्ये रीड स्वीचचा वापर करु नये त्याचे डिझाईन नियमानुसार असणे अनिवार्य आहे.

Rule 5/6(a) : The old and obsolete limit switch type (reed type) landing gate locks shall be replaced by electromechanical (universal type) locks.

१५) मुंबई उद्वाहन नियम १९५८ मधील नियम ५/५ (d) स्विंगटाईप लँडीग गेट व कारगेट यांच्यातील अंतर ७५ मी.मी. पेक्षा जास्त नसावे.

Rule 5/5(d) : The distance between the swing type landing gates and the car gate shall not be more than 75 mm .

१६) मुंबई उद्वाहन नियम १९५८ मधील नियम ५/७ (f) प्रत्येक मजल्यावरील उदवाहनाचा दर्शनी भाग हा योग्य क्षमतेने प्रकाशीत करावा.

Rule 5/7(f) :- The approach to the landing gate on each floor shall be well lighted with adequate illumination.

१७) *IS 14665:2000 Part 3: Section I Clause 6.2 (proposed) : Every passenger lift shall be provided with an overload device which will prevent the lift car from starting in case the lift car is loaded to 110 percent of the rated capacity of the lift or more. The lift shall remain stationary with door open. Audio visual warning device shall be provieded to alert the passenger in case of overload.

**Note :** 1) Please note that in addition to the contents of the above circular all the provisions of the Bombay Lift Act 1939 and The Bombay Lift Rules 1958 framed thereunder shall be observed.

2) All licenced lift contractors shall hand over the copy of the circular to the concerned owner of each lift under their maintenance contract for the due observance of the contents of the circular.

जा.क्र. वि.निउ:मुं/मु.लि./ १३४६/ सन २०१०
विद्युत निरिक्षक, (उद्वाहन मुंबई ) यांचे कार्यालय
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, प्रशासकीय विभाग
पहिला मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
सार्वजनिक बांधकाम विभाग आवार,
रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पुर्व)
मुंबई ४०० ०७१ - २३/११/२०१०.

(सं.मु.भस्मे)
विद्युत निरिक्षक(उद्वाहन मुंबई)
उ.ऊ.व कामगार विभाग
चेंबूर मुंबई